महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
Maharashtra Housing & Area Development Authority
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर,
वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१. दू. क्र. :- ०२२ ६६४०५०७७,
६६४०५०६६ ई मेल - cpromhada@gmail.com

==================================================================

जावक क्रमांक – ४४९६/६१ दिनांक :- १६ ऑक्टोबर, २०२३

प्रसिद्धिपत्रक

# म्हाडा कोंकण मंडळाच्या ५३११ सदनिकांच्या विक्रीसाठी ऑनलाइन अर्ज सादर करण्याकरिता १५ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ

प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य योजनेतील अर्जदारांना स्वीकृतीपत्र लवकरच ऑनलाइन मिळणार

मुंबई, दि. १६ ऑक्टोबर, २०२३ :- म्हाडाच्या कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे ठाणे शहर व जिल्हा, पालघर, रायगड, सिंधुदुर्ग येथील विविध गृहनिर्माण योजनेअंतर्गत उभारलेल्या ५३११ सदनिकांच्या विक्रीकरिता ऑनलाईन संगणकीय सोडतीसाठी अर्ज नोंदणी व अर्ज सादर करण्याकरिता दि. १५ नोव्हेंबर, २०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. नवीन वेळापत्रकानुसार दि. १३ डिसेंबर, २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता वांद्रे पूर्व येथील म्हाडा मुख्यालयात संगणकीय सोडत काढण्यात येणार आहे. तसेच सोडतीतील प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या योजनेत सहभाग घेणाऱ्या अर्जदारांना लवकरच स्वीकृती पत्र ऑनलाइन पद्धतीने पाठविण्यात येणार असल्याचा निर्णय मंडळातर्फे जाहीर करण्यात आला आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे (म्हाडा) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांच्या हस्ते दि. १५ सप्टेंबर, २०२३ रोजी सोडतीसाठी ऑनलाइन अर्ज नोंदणी व अर्ज भरणा प्रक्रियेचा शुभारंभ करण्यात आला. अर्जदारांच्या सोयीकरिता मंडळातर्फे सोडतीत सहभागी होण्याकरिता मुदत वाढ देण्यात आली आहे. नवीन वेळापत्रकानुसार दिनांक १५ नोव्हेंबर, २०२३ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत ऑनलाईन अर्ज करण्याची मुदतवाढ देण्यात आली आहे. दिनांक १७ नोव्हेंबर, २०२३ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत ऑनलाईन अनामत रक्कमेची स्वीकृती केली जाणार आहे. दिनांक १७ नोव्हेंबर, २०२३ रोजी संबंधित बँकेच्या कार्यालयीन वेळेत RTGS / NEFT द्वारे अनामत रकमेचा भरणा अर्जदारांना करता येणार आहे. सोडतीसाठी प्राप्त अर्जांची प्रारूप यादी दिनांक ०४ डिसेंबर, २०२३ रोजी सायंकाळी ६.०० वाजता प्रसिद्ध केली जाणार आहे. सोडतीसाठी स्वीकृत अर्जाची अंतिम यादी ११ डिसेंबर, २०२३ रोजी सायंकाळी सहा वाजता म्हाडाच्या https://housing.mhada.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे.

कोंकण मंडळातर्फे जाहीर करण्यात आलेली सोडत पाच घटकांमध्ये विभागण्यात आली आहे यामध्ये प्रधामंत्री आवास योजनेअंतर्गत १०१० सदनिकांचा समावेश आहे. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत

अर्ज करणाऱ्या नागरिकांनी PMAY योजने अंतर्गत नोंदणी करणे आवश्यक आहे. तथापि नोंदणी केलेली नसल्यास सोडतीतील यशस्वी अर्जदारांनी नोंदणी करणे बंधनकारक राहील. कोंकण मंडळातर्फे प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच एकात्मिक गृहनिर्माण योजनेअंतर्गत १०३७ सदनिका, सर्वसमावेशक योजनेअंतर्गत ९१९ सदनिका, टीव्ही जर्नलिस्ट असोसिएशन यांच्यासाठी ६७ सदनिका आहेत. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या योजने व्यतिरिक्त इतर सर्व योजनांकरिता २० % प्रतीक्षा यादी ठेवण्याचा निर्णय मंडळाने घेतला आहे.

त्याचबरोबर सोडतीतील प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या योजनेत सहभाग घेणाऱ्या अर्जदारांना मंडळातर्फे लवकरच स्वीकृती पत्र ऑनलाइन पद्धतीने पाठविण्यात येणार आहे. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या योजनेअंतर्गत २२७८ सदनीकांकरीता ४५० अर्ज प्राप्त झाले आहेत. अर्जदारांनी सदनिकेच्या रकमेचा भरणा केल्यानंतर लाभार्थ्यांना तातडीने सदनिकेचा ताबा देण्याचे नियोजन मंडळातर्फे करण्यात आले आहे. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य योजनेतील विरार बोळींज प्रकल्पातील सदनिका घेऊ इच्छिणाऱ्या अर्जदारांकरिता मंडळातर्फे उत्पन्नाची अट शिथिल करण्यात आली असून अर्जदाराने उत्पन्नाचा कुठलाही पुरावा सादर करणे गरजेचे नाही. अर्ज करण्यासाठी अर्जदाराचे आधारकार्ड व पॅन कार्ड आवश्यक असून अर्जदार विवाहित असल्यास पती व पत्नी दोघांचे आधारकार्ड, पॅन कार्ड लागणार आहे. एक अर्जदार या प्रकल्पात एकापेक्षा अधिक सदनिकांकरीता अर्ज करू शकतात. या सर्व इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त (OC received) असून रेडी टू मुव्ह स्वरुपातील प्रॉपर्टी आहे. विक्री किंमत भरल्यावर दोन आठवड्यात ताबा दिला जाणार आहे. विस्तृत ४१ एकरवरील या प्रकल्पाबाबत अधिक माहितीसाठी म्हाडाच्या ०२२ ६९४६८१०० या २४ तास कार्यरत हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे. या योजनेतील शेवटची सदनिका विकली जाईपर्यंत नोंदणीकरण आणि अर्ज भरणा प्रक्रिया सुरू राहील. तसेच प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या योजनेत सहभाग घेण्याकरिता https://lottery.mhada.gov.in या संकेत स्थळावर नोंदणी व अर्ज भरावा. सोडतीतील इतर योजनांसाठी ऑनलाइन अर्ज करण्यासाठी अर्जदारांनी https://mhada.gov.in व https://housing.mhada.gov.in या संकेतस्थळांना भेट द्यावी. अनामत रक्कम भरणा व परतावा संबंधित सुविधेकरिता इंडियन बँकेच्या ७०६६०४७२१४ व ९५२९४८५७८० या कॉल सेंटर हेल्पलाइन वर संपर्क साधावा.

IHLMS 2.0 या नूतन संगणकीय प्रणाली व ॲपच्या सहाय्याने सदनिकांच्या अर्ज नोंदणी प्रक्रियेस दि. १५ सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी १०.३० वाजेपासून सुरुवात झाली. IHLMS 2.0 या नूतन संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून सोडत प्रक्रियेत सहभाग घेणे नागरिकांच्या दृष्टीने सुलभ व सोपे झाले आहे. कारण अर्जदार घरबसल्या अथवा कुठूनही सोडत प्रक्रियेत सहभाग घेऊ शकतात. नोंदणीकरण, कागदपत्र अपलोड करणे आणि ऑनलाईन पेमेंट यांसारख्या सुविधा या प्रणालीच्या माध्यमातून सहजरित्या उपलब्ध होणार आहेत. सोडतीत सहभागी होण्याकरिता IHLMS 2.0 ही संगणकीय आज्ञावली अर्जदार अँड्रॉइड (android) अथवा आयओएस (ios)या दोन्ही ऑपरेटिंग सिस्टिमवर उपलब्ध आहे. ॲण्ड्रोइड व्हर्जनच्या मोबाईलमध्ये गूगल ड्राइव्हच्या प्ले स्टोअर आणि आयओएस व्हर्जन ॲप स्टोअरमध्ये Mhada Housing Lottery System या नावे मोबाइल ॲप उपलब्ध करुन देण्यात आले आहे. तसेच अर्जदारांच्या सोयीकरिता https://housing.mhada.gov.in या म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावर देखील अर्ज

नोंदणी प्रक्रिया उपलब्ध करून देण्यात आली आहे. अर्जदारांना नवीन संगणकीय प्रणालीची माहिती देणारी मार्गदर्शनपर माहिती पुस्तिका, ध्वनीचित्रफिती आणि हेल्प फाईल या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

श्री. मोरे यांनी सोडतीत सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या अर्जदारांना आवाहन केले आहे की, संगणकीय सोडत प्रणाली ही संपूर्णतः ऑनलाईन व पारदर्शक असून यामध्ये मानवी हस्तक्षेपास कोणत्याही प्रकारे वाव नाही. करिता या सदनिकांच्या विक्रीकरिता कोणत्याही व्यक्तीच्या, मध्यस्थांच्या खोट्या प्रलोभनांना बळी पडू नका. तसेच  मंडळाने कोणालाही सल्लागार व प्रॉपर्टी एजंट, त्रयस्थ /दलाल/ मध्यस्थ व्यक्ती नेमलेले नाहीत. अशा प्रकारच्या गैरव्यवहारास अथवा फसवणुकीस कोंकण मंडळ अथवा म्हाडा जबाबदार राहणार नाही, याची नागरिकांनी दाखल घ्यावी.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण